दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा. सं/ जनसंपर्क/ प्रेस नोट/ ३१

## श्री. चंद्रकांत थोटवे यांची महानिर्मितीच्या संचालक (प्रकल्प) या पदावर नियुक्ती

महानिर्मितीचे नूतन संचालक (प्रकल्प) म्हणून श्री. चंद्रकांत थोटवे यांची खुल्या निवडप्रक्रियेतून नियुक्ती करण्यात आली आहे. नुकताच महानिर्मितीच्या मुख्यालयात या पदाचा कार्यभार त्यांनी श्री. अरुण डवलेकर, प्रभारी संचालक (प्रकल्प) यांचेकडून स्विकारला. यापूर्वी श्री. थोटवे हे जानेवारी २००८ पासून महानिर्मितीच्या कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था) या पदावर प्रकाशगड, मुख्यालय येथे कार्यरत होते.

विद्युत अभियांत्रिकीतील पदवीधर असलेले श्री. थोटवे महानिर्मिती (पूर्वीची महाराष्ट्र राज्य वीज मंडळ) च्या सेवेत १९८३ सालापासून रुजू आहेत. महानिर्मिती-महावितरण-महापारेषण या तीनही कंपन्यांच्या कार्यप्रणालीचा विस्तृत अनुभव त्यांच्या गाठीशी आहे. श्री. थोटवे यांनी नाशिक - चंद्रपूर औष्णिक वीज केंद्रात व्यवस्थापनात मोलाची कामगिरी बजावली आहे. तसेच नांदेड-औरंगाबाद व नागपूर विभागात श्री. थोटवे यांनी वितरण कंपनीच्या विविध योजनांमध्ये देखील लक्षणीय सहभाग नोंदवला आहे. महानिर्मितीच्या मुख्यालयात मुख्य महाव्यवस्थापक (भांडार) विभागाची धुरा समर्थपणे पेलताना संचलन व सुव्यवस्था तसेच नवीन प्रकल्पांसाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीचा सुनियोजित पुरवठा करण्याची तरतूद केली. तसेच त्यांच्या पुढाकाराने महानिर्मितीने ई-टेंडरिंग, ई-ऑक्शन या संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यास सुरुवात केली. मुख्यालयात त्यांनी मुख्य महाव्यवस्थापक (तांत्रिक) या पदाचाही अतिरिक्त कार्यभार सांभाळला आहे. औष्णिक विद्युत केंद्रांना लागणारा कोळसा व उरण वायु विद्युत केंद्रांसाठी लागणारा इंधन वायु पुरेश्या प्रमाणात उपलब्ध व्हावा, यासाठी त्यांनी कार्यकारी संचालक या पदावरुन अथक प्रयत्न केले आहेत.

महानिर्मितीने आगामी काही वर्षांत सुमारे ७७०० मेगावॅटहून अधिक क्षमतेच्या वीज प्रकल्पांचे कार्य पूर्णत्वास नेण्याचे नियोजन केलेले आहे. सदर प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निर्धार श्री. थोटवे यांनी आपला पदभार स्विकारताना व्यक्त केला.

---

दिनांक : ३१/०८/२००९.

प्रति,

**माननीय संपादक,**

दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**